Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
VOL- XII | ISSUE- VIII | AUGUST | 2025 | PEER REVIEW e-JOURNAL | IMPACT FACTOR 8.379 | ISSN 2349-638x

# मराठी बालकवितेतील स्थित्यंतरे : एक अभ्यास

संशोधक
**समाधान शिकेतोड**
प्राथमिक शिक्षक
जि.प.प्रा.शाळा राघुचीवाडी ता.जि.धाराशिव

मार्गदर्शक
**प्रा .डॉ.बाळासाहेब जाधव**
प्राध्यापक व विभागप्रमुख
कला महाविद्यालय, नांदूर घाट ता.केज जि.बीड

**प्रस्तावना :-**

शालेय पाठ्यपुस्तकातील बालगीते, बालकविता आजही आपण गुणगुणत असतो. इतर बालसाहित्यापेक्षा बालकवितेत मुलांच्या भावनांचे प्रतिबिंब उत्कटतेने पाहायला मिळते. मुलांचा जन्म झाल्यावर त्याला सुरवातीला 'अंगाई गीत' ऐकायला मिळते. मुले आईच्या मांडीवर, पाळण्यात 'अंगाई गीत' ऐकत ऐकत झोपी जातात. यातून मुलांना स्वरांची जाणीव अगदी बालपणीच होत असते. बालकवितेत शब्दचमत्कृती, अर्थसमृद्धी, कल्पनाशीलता आणि रंजकता या गोष्टी खूप महत्त्वाच्या असतात. कमी अक्षरे असलेल्या आशयसमृद्ध बालकविता बालमनाला भावतात. उत्तम बालकविता मुलांना पुन्हा पुन्हा ऐकावीशी, वाचाविशी, गुणगुणाविशी वाटते. बालकविता लिहिणाऱ्या कवीला बालमनाची उत्तम जाण असावी लागते. कल्पनाशक्ती असलेली, अभिनयप्रधान, क्रिडाप्रधान, भावनेनेयुक्त, कथेचा अंश असलेली, विनोदीबुद्धी असलेली अशी बालकविता मुलांना आवडते.

मुले स्वतःचे एक जग निर्माण करून त्यात जगत असतात. मोठ्यांच्या विश्वाशी त्यांना फारसे देणेघेणे नसते. विमानाच्या खेळण्याशी खेळताना ते विमानाचा आवाज काढतात. प्राण्यांशी खेळताना प्राण्याचा आवाज काढतात व स्वतःशीच खूश होतात मुलांचे मन, भावविश्व, आवडीनिवडी, अपेक्षा बालकविला समजून घेता आल्या पाहिजेत. बालकवितेत कल्पनांची तरलता, गेयता, नवलाई या बाबी असायला हव्यात. बालकवितेच्या रचना सहज हवी. लांबलचक, अलंकारी शब्द असणारी कविता मुलांना रुचत नाही. बालवाचकांना गमतीजमती फार आवडतात. त्यामुळे 'कथात्मक कविता' मुलांना आवडत असतात. बालजीवनात खेळांना खूप महत्त्व असते. त्यामुळे मुलांना क्रीडागीते भुरळ घालतात.

**१) मौखिक परंपरा :** सुरवातीच्या काळात बालकविता मौखिक परंपरेने पुढच्या पिढीकडे जात राहिली. मुद्रणकलेच्या शोधानंतर बालकविता मासिकामधून छापून येऊ लागल्या. काळानुसार बालकवितेत अनेक स्थित्यंतरे आली. आजूबाजूचे भोवताल जसे जसे बदलत गेले तसे मुलांचे भावविश्व बदलत गेले. एकोणीसाव्या शतकात मराठी बालकविता लेखन सुरु झाले होते. या काळात रेव्हरंड टिळक, कवी दत्त, त्र्यंबक बापुजी ठोंबरे यांनी मुलांसाठी बालकविता लिहिल्या. त्या काळी मुलांचे स्वतंत्र बालकवितासंग्रह प्रकाशीत होत नव्हते. प्रौढांच्या साहित्यासोबतच मुलांच्या बालकविता छापून येत असत.

**२) बालकवितेचा आधुनिक कालखंड :** १९१० नंतर बालकवितेचा आधुनिक कालखंड सुरु झाला. 'आनंद' मासिकातून अनेकजण बालकविता लिहू लागले. १९२० नंतर बालकवितेचा 'आधुनिक कालखंड' सुरु झाला. मॉंटेसरी शिक्षण पद्धतीमागील मुख्य भूमिका मारिया मॉंटेसरी यांच्या शिक्षण पद्धतीचा पूर्व प्राथमिक शिक्षणावर प्रभाव दिसू लागला होता. या शिक्षण पद्धतीचा बालकवितेवर प्रभाव पडू लागला. या कालावधीत मुलांसाठी लिहिली जाणारी बालकविता सोप्या आशयाची, कमी लांबीची असावी असा प्रघात सुरु झाला. यावेळी मुलांसाठी क्रीडागीते, अभिनयगीते लिहिली जाऊ लागली.कवी वा.गो. मायदेव यांनी या पद्धतीने बालकविता लिहिली. मुलांसाठी अगदी चार चार ओळीची रचना करण्याची सुरवात त्यांनीच केली.त्यांची एक सुंदर रचना.

*मिठू मिठू पोपट, चोंच किती लाल*
*विडा का खाल्लास काल ?*

कवी मायदेवांनी शिशुगीत, बालगीत, क्रीडागीत, अभिनयगीत, छंदगीत अशी वेगवेगळ्या प्रकारात बालकविता लिहिली. या कालखंडात या दृष्टीने सोपी व सुंदर बालकविता लिहिणाऱ्यांची एक नवी पिढीच उद्याला आली. अपर्णा देशपांडे, म. का. कारखानीस, वि. म. कुळकर्णी, गोपीनाथ तळवलकर, भवानीशंकर पंडित, ना. गं. लिमये, ग. ह. पाटील, कुसुमाग्रज, शांताराम आठवले, ह. स. गोखले,माधव जुलियन इत्यादी कवींनी बालकविता समृध्द केली. या कालखंडात कल्पना व शब्दचमत्कृती यांच्या सोप्या अविष्कारामुळे बालकवितेला बहार आला.वि.म.कुलकर्णी यांच्या 'झुक झुक झुक' या कवितेच्या काही ओळी पहा.

*गाडी आली गाडी आली झुक झुक झुक*
*शिटी कशी वाजे बघा कुक् कुक् कुक्*
*इंजीनाचा धूर निघे भक् भक् भक्*
*चाके पाहू तपासून ठक् ठक् ठक्*

आधुनिक बालकाव्यामध्ये 'कल्पना वैचित्र्य' हा एक पैलू दिसून येतो. कल्पना वैचित्र्य या पैलूमुळे बालकवितेला एक प्रगतदिशा मिळाली. बालकवितेला आशयची एक चाकोरी होती. तो कल्पना वैचित्र्य या गुणामुळे बदलून गेली. एका मुलाची अपेक्षा पुढील बालकाव्यातून दिसून येते.

*असावा सुंदर चॉकलेटचा बंगला*
*चंदेरी सोनेरी चमचमता चांगला*
*चॉकलेटच्या बंगल्याला टोफीचं दार*
*शेपटीच्या झुपक्यानं झाडून जाईल खार !*

**३) बालकवितेला बहर आला :** १९६० ते १९७० या काळात बालकविता बहरत गेली. बालगीते नव्या उत्साहाने, नव्या प्रेरणेने प्रभावित होऊन आली. वि. म. कुलकर्णी, राजा मंगळवेढेकर, लीलावती भागवत, संजीवनी मराठे, सदानंद रेगे, विंदा करंदीकर, मंगेश पाडगावकर, ग.दि.माडगुळकर, शांता शेळके, तारा वैशंपायन, सरिता पदकी, ताराबाई मोडक,डॉ.विजया वाड अशा कितीतरी कवींनी आविष्काराच्या निरनिराळ्या पद्धतीने गीतरचना केल्या. बालकवितेत निरनिराळे प्रयोग केले. ताराबाई मोडक यांनी तर प्रत्यक्ष मुलांसोबत काम केले. आकर्षक, सुंदर,सुबक आकाराची रंगीत चित्रांची, विविधरंगी असणारी बालकवितांची पुस्तके निघाली. १९९० नंतर बालकविता मुक्तछंदात येऊ लागली. गद्ययुक्त रचना असणाऱ्या या कविता होत्या. त्या कवितेत कथात्मता होती. काव्याच्या माध्यमातून कथा सांगितली जायची. काही अल्प कवींनी अशा रचना केलेल्या आहेत. २००० च्या दशकात बालकवितेत वैज्ञानिक दृष्टीकोन रुजावा अशा कल्पना दिसून येतात. मुलांनी चिकित्सकपणे, डोळसपणे आजूबाजूच्या जगाकडे पाहावे अशा कविता या कालखंडात लिहिलेल्या दिसून येतात.

२००० ते २०२० पर्यंत वैविध्यपूर्ण बालकविता मुलांसाठी लिहिल्या गेल्या. अनंत भावे, निलीमा गुंडी, महावीर जोंधळे, संगीता बर्वे, किशोर पाठक, डॉ. सुरेश सावंत, दासू वैद्य,इंद्रजीत भालेराव, डॉ.लीला दीक्षित,पद्मिनी बिनीवाले,रेणू पाचपोर, प्रवीण दवणे,माया धुप्पड, उत्तम कोळगावकर, उत्तम सदाकाळ, विलास सिंदगिकर, एकनाथ आव्हाड, आसावरी काकडे, भगवान अंजनीकर, वीरभद्र मिरेवाड, कल्याण इनामदार,बबन शिंदे, लीला शिंदे, डॉ.कैलास दौंड,ज्योती कपिले, आबा महाजन, सदानंद पुंडपाळ, फारूक काझी, सचिन भेंडभर, विठ्ठल जाधव, संदीप खरे, मुबारक शेख, डॉ.अशोक कोळी,गणेश घुले, बालाजी इंगळे या कवींनी समृद्ध मराठी बालकविता मुलांसाठी लिहिल्या. या कवींच्या कविता 'किशोर' मासिकातून मुलांपर्यंत पोहचल्या. पाठ्यपुस्तकाच्या माध्यमातून मुले बालकविता नाचून-गाऊन म्हणू लागली. या बालकविता डीजीटल माध्यमांच्याद्वारे मुलांपर्यंत पोहचल्या गेल्या. मुले बालगीते, बालकविता टीव्हीवर, मोबाईलवर पाहू लागली. कार्टून व संगीताच्या तालावर ही बालगीते पाहण्याची त्यांना मजा येऊ लागली.

**४) प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रम:** महाराष्ट्रात 'प्रत्येक मुलं शिकावं' यासाठी शिक्षण विभागामार्फत 'प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रम' सुरु झाला. या कार्यक्रमाच्या अनुषंगाने शाळाशाळांमधून मुलांच्या अभिव्यक्तीच्या विकासासाठी अनेक प्रकल्प, उपक्रम राबविण्यात येऊ लागले. तत्कालिन प्रयोगशील गटशिक्षणाधिकारी नामदेव माळी, तृप्ती अंधारे,गणपती कळमकर यांनी मुलांच्या लिहित्या हाताला बळ देण्यासाठी मुलांच्या बालकवितासंग्रहाचे संपादन केले. तृप्ती अंधारे यांनी माजलगाव तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या शाळेतील मुलाच्या बालकवितांचे संपादन करून 'दप्तरातील कविता' हा बालकवितासंग्रह प्रकाशित केला. गणपती कळमकर यांनी गडहिंग्लज तालुक्यातील विद्यार्थ्यांच्या बालकवितांचे संपादन करून 'छोट्या दोस्तांच्या कविता' हा बालकवितासंग्रह

VOL- XII | ISSUE- VIII | AUGUST | 2025 | PEER REVIEW e-JOURNAL | IMPACT FACTOR 8.379 | ISSN 2349-638x

प्रकाशित केला. यवतमाळ या ठिकाणी शिक्षणाधिकारी म्हणून कार्यरत असताना डॉ.सुचिता पाटेकर यांनी व्यसनमुक्ती या विषयावर 'हल्लाबोल' या कवितासंग्रहाचे संपादन केलेले आहे. शालेय विद्यार्थी आपल्या भावना,अनुभव, विचार कवितेच्या माध्यमातून मांडू लागले.

**५) बालकवितेला पाठ्यपुस्तकात स्थान:** २०१० सालानंतर मुलांचे बालकवितासंग्रह प्रकाशित होऊ लागले. २०१५ साली इयत्ता सहावीच्या पाठ्यपुस्तकात इयत्ता सहावीच्या मुलीचीच कविता आली. या बालमित्रांच्या बालकवितासंग्रहाला पुरस्कार मिळू लागले. नव्या दमाने लिहिणारी कवीमंडळी तयार झाली; परंतु अलीकडे बालकवितेचा दर्जा घसरलेला दिसून येतो. बहुतेक कविता गेयतापूर्ण नाहीत. यमक जुळविण्याच्या नादात कवितेचे काव्यसौदर्य, भावसौदर्य कुठेतरी हरवलेले दिसून येते. मुलांच्या मनाचा ठाव घेणाऱ्या कविता खूप कमी प्रमाणात लिहिल्या गेल्या असल्याचे दिसून येते.

**सारांश** :- मराठी बालकविता नेमकी केव्हापासून सुरु झाली हे सांगता येत नाही. लोकसाहित्यातून तिचा उगम झाला. सुरुवातीच्या काळात मौखिक पद्धतीने ती पुढच्या पिढीकडे गेली. मुद्रणकलेच्या शोधानंतर ती मासिकांमधून प्रकाशित होऊ लागली. पुढे वेगवेगळ्या वयोगटासाठी बालकविता लिहिली जाऊ लागली. तिला शिशुगीते, बालगीते, बालकविता असे म्हणू लागले. शिशुगीते व बालगीतांमध्ये संवादगीते, क्रीडागीते लिहिली गेली. १९६० ते १९७० या काळात बालकविता बहरत गेली. बालगीते नव्या उत्साहाने, नव्या प्रेरणेने प्रभावित होऊन आली. अनेक बालकवींनी बालमन समृद्ध केले. १९९० नंतर बालकविता मुक्तछंदात येऊ लागली. गद्ययुक्त रचना असणाऱ्या या कविता होत्या. त्या कवितेत कथात्मता होती. काव्याच्या माध्यमातून कथा सांगितली जायची. काही अल्प कवींनी अशा रचना केलेल्या आहेत. २००० च्या दशकात बालकवितेत वैज्ञानिक दृष्टीकोन रुजावा अशा कल्पना दिसून येतात. मुलांनी चिकित्सकपणे, डोळसपणे आजूबाजूच्या जगाकडे पाहावे अशा कविता या कालखंडात लिहिलेल्या दिसून येतात. एकविसाव्या शतकात बालकवितेला डीजीटल माध्यमांची जोड मिळून नव्या रुपात बालमित्रांना भेटली. बालकविता फक्त प्रौढच करू शकतात ही धारणा गळून पडली. शालेय विद्यार्थी दर्जेदार बालकविता लिहू लागले. बालकावितेचा हा प्रवास काळानुसार समृद्ध होत गेला.

**संदर्भ**:-


१) डॉ.इंगवले शोभा, आधुनिक मराठी बालकविता भाग -१ , २०१७,पान क्र.५८
२) दांडेकर मालती, बालसाहित्याची रूपरेषा, पृष्ठ क्र.१६०
३) दांडेकर मालती, बालसाहित्याची रूपरेषा, पृष्ठ क्र.१६८
४) डॉ.सावंत सुरेश, वाचनसंस्कृती, लेखनसंस्कृती, २०२१,पान क्र.१४६
५) डॉ.सावंत सुरेश, वाचनसंस्कृती, लेखनसंस्कृती, २०२१,पान क्र.२०५
६) डॉ.सावंत सुरेश, बालसाहित्य आणि बालशिक्षणाचा अनुबंध,२०२१,
७) तृप्ती अंधारे, दप्तरातल्या कविता, प्रतिमा पब्लिकेशन पुणे,२०१३